स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या सामाजिकशास्त्रे

विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या

संशोधन प्रबंधाचा आराखडा

== संशोधनाचा विषय ==

" पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूतगिरणी उद्योगाचा चिकित्सक अभ्यास"

(2005-2015)

- मार्गदर्शक -

डॉ. विकास. वि. सुकाळे

संशोधन मार्गदर्शक व अर्थशात्र विभागप्रमुख,

पीपल्स कॉलेज, नांदेड

- संशोधक -

संभाजी भगवान शिंदे (एम.ए.)

विज्ञान महाविद्यालय ,सांगोला

ता.सांगोला जि.सोलापूर .

मार्च – २०१६

"पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूतगिरणी उद्योगाचा चिकित्सक अभ्यास"

(२००५-२०१५)

I) प्रस्तावना :-

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी उद्योगाप्रमाणेच वस्त्रोद्योगाला देखील महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.कारण हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा वस्त्रोद्योग जो कृषी उद्योगानंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करणारा उद्योग म्हणून गणला जातो.कृषी क्षेत्र,औद्योगिक क्षेत्र संघटीत आणि असंघटीत क्षेत्र तसेच ग्रामीण आणि नागरी भागामध्ये रोजगार निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात या उद्योगाला संधी आहे.या उद्योगाचे महत्व लक्षात घेता मानवाच्या तीन मुलभूत गरजांपैकी एक गरज भागवणारा उद्योग जो खुली अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरणाच्या युगात कोठा निर्बंध उठल्यामुळे तसेच बऱ्याच अंशी जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाल्याने प्रचंड व्यापाराची,उत्पादनाची संधी भारतीय वस्त्र उद्योगाला निर्माण झाली आहे.

सध्या चीननंतर भारताला उरोपियन बाजार पेठेमध्ये सिंहाचा वाटा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.कारण आपल्या देशात सूतगिरण्याकरीता कच्यामालाचा पुरवठा, सूतगिरण्यांना आवश्यक असणाऱ्या तंत्र-यंत्राचा पुरवठा,प्रशिक्षित व निपुण-कर्मचारी,प्रगत माहिती तंत्रज्ञान वगैरे यांचा पुरवठा मुबलकतेने असल्याने या उद्योगाचे लाभ भारताला मिळू शकतात.भारतामध्ये कच्च्यामालाचा म्हणजेच कापसाची उपलब्धता लक्षात घेतल्यास असे दिसते की, जगाच्या उत्पादनामध्ये भारताचा कापूस उत्पादनाचा वाटा जवळपास २०% इतका आहे व जवळपास ९० लाख हेक्टर जमीन कापूस लागवडीखाली आहे.तसेच देशामध्ये प्रति हेक्टर ४६७.४४ किलो इतके कापूस उत्पादन आहे.

भारताच्या वस्त्रोद्योगाच्या इतिहासाकडे पाहिल्यास असे दिसते की या उद्योगाला सुमारे १८० वर्षाचा इतिहास आहे.कारण भारतातील पहिली कापडगिरणी १८५४ मध्ये मुंबई येथे श्री.सी.एन.दावर यांनी सुरु केली होती.त्यानंतर मोठ्या प्रमाणात कापडगिरण्यांची सुरवात विशेषतः अहमदाबाद,मदुराई,कोईमतूर,कानपूर इत्यादी ठिकाणी झाली.

स्वातंत्र्यपूर्व काळात कापूस उत्पादन मोठ्या प्रमाणात होत होते,परंतु कापूस प्रक्रिया उद्योगाकरिता आधुनिक तंत्रज्ञानाची,यंत्रसामग्रीची कमतरता मोठ्या प्रमाणात वाढली होती.युरोपियन स्पर्धेत या व्यवसायाकडे बघण्याचा इंग्रज सरकारचा दृष्ठीकोनही योग्य नव्हता.परंतु स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने या व्यवसायाचे महत्व ओळखून या व्यवसायाला भविष्यात चांगले दिवस यावेत म्हणून सन २००० मध्ये राष्ट्रीय कापड धोरण जाहीर करण्यात आले.देशातील लोकांना सर्वमान्य गुणवत्तेचे कापड किफायतशीर दारामध्ये उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणे हा सन २००० वस्त्र धोरणाचा मुख्य उद्धेश होता.अलीकडेच महाराष्ट्र राज्यानेही आपले कापड धोरण जाहीर केले.ज्याच्यामध्ये ४०,००० कोटी रुपये गुंतवणुकीचे उद्धिष्ट ठेऊन गुंतवनुकादारांना भांडवल गुंतवनुकीमध्ये भरीव प्रमाणात अनुदान देण्याचे ठरविले आहे.

II) भारतीय सहकारी सूतगिरणी उद्योगांची वृद्धी :-

भारतीय सूत व कापड उद्योगांची (लघु उद्योग वगळता) वृद्धी लक्षात घेता,सूतगिरण्या आणि संयुक्त गिरण्यांची संख्या आणि स्थापित चात्यांची संख्या दोन्ही ही मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते.१९५१ मध्ये सूतगिरण्यांची संख्या १०७ इतकी होती.ती १९७१ मध्ये ३७९, १९९१ मध्ये ७७७, २००१ मध्ये १५६५ तर २०१२ मध्ये १७५७ इतकी झाली.म्हणजे याचाच अर्थ असा की सूतगिरण्यांची संस्थेत वर्षागणिक संख्या वाढत चाललेली आहे.परंतु, संयुक्त गिरण्यांची संख्या मात्र घटत चाललेली आहे.

स्थापित चात्यांची संख्या देखील भरीव प्रमाणात वाढल्याचे दिसते.१९५१ मध्ये ११.२५ दश लक्ष स्थापित चात्यांची संख्या होती ती १९७१ मध्ये १७.९८, १९९१ मध्ये २६.६७, २००१ मध्ये ३५.५३ आणि २०११ मध्ये ४२.६९ दश लक्ष इतकी झाली.

कापसापासून सूत तयार करणे हा कापड उद्योगाचाच एक भाग आहे. की जो आज खूप मोठ्या प्रमाणात महागडा आणि स्पर्धात्मक झाला आहे.देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतामध्ये सहकारी क्षेत्राचे महत्व वाढू लागले.त्याचाच भाग म्हणून नंतर भारतामध्ये सहकारी क्षेत्रामध्येही अनेक सहकारी सूतगिरण्या उदयाला आल्या आहेत.१९५१ मध्ये पहिली सहकारी सूतगिरणी 'गुंटकळ 'येथे स्थापन झाली की जी "मद्रास राज्य हातमाग विणकर फेडरल सहकारी सोसायटी " या नावाने ओळखली जाते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात २१ नवीन सहकारी सूतगिरण्या उदयाला आल्या.तिसऱ्या पंचवार्षिक योजना काळात सरकारने सहकारी सूतगिरण्याबाबत काही सवलती जाहीर केल्या होत्या त्याचाच भाग म्हणून १९७३ मध्ये नवीन २४ सहकारी सूतगिरण्या रजिस्टर झाल्या.१९९९ च्या दरम्यान भारतात १३५ सूतगिरण्या होत्या.त्यापैकी ११८ सूतगिरण्या सुस्थितीत होत्या.(५५ कापूस उत्पादकांच्या तर ६३ विणकरांच्या होत्या) २०००-२००१ मध्ये भारतात १५६ सहकारी सूतगिरण्या होत्या.

२०११ च्या राज्य वर्गवारीनुसार आणि व्यवस्थापनानुसार सांख्यिकी लक्षात घेता, एकूण १७५७ सूतगिरण्यापैकी १५३२ सूतगिरण्या खाजगी मालकीच्या होत्या.तर १५८ सहकारी तत्वावर होत्या.तसेच ३५ व ३४ सूतगिरण्या अनुक्रमे केंद्र आणि राज्य सरकारच्या मालकीच्या होत्या.म्हणजेच देशाच्या पातळीवर एका बाजूला सुत व कापड गिरण्यांची संख्या वाढत आहे.मात्र दुसऱ्या बाजूला खाजगी मालकीच्या सूतगिरण्या वाढताना दिसत आहेत.आणि याउलट सहकारी तत्वावरील सूतगिरण्याची संख्या मात्र कमी होत चाललेली आहे.

III) **महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरणी उद्योग :-**

महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे औद्योगीकरण झालेले राज्य आहे.महाराष्ट्र राज्याचा वस्त्रोद्योग दरवर्षी हजार कोटीच्या वार्षिक उलाढालीतून १३०० लाख किलो सूताची निर्मिती व २०० कोटी रुपये विविध करांच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारला उत्पन्न मिळवून देत असतो.या उद्योगामुळे कित्येक लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे.रोजगार निर्मिती आणि ग्रामीण विकासात याला खूप महत्व आहे.

महाराष्ट्रामध्ये पहिली सहकारी सूतगिरणी १९६० मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे स्थापन झाली.की जी "डेक्कन को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल"म्हणून ओळखली जाते.

वास्तविक पाहता १९४३ मध्ये राज्य सरकारने व राजा ऑफ भोर यांनी 'श्री लक्ष्मी टेकष्टाइल मिल' सुरु केली होती ती १९५३ मध्ये बंद पडली होती १९५९-१९६० मध्ये कामगारांनी सहकारी तत्वावर सोसायटी स्थापन केली.ती श्री शिवाजी टेक्स्टाइल वर्क्स को-ऑपरेटिव्ह स्पिनिंग मिल ही राज्य सरकारच्या सहकार्याने सुरु केली होती.१९६० साली महाराष्ट्रामध्ये सहकारी तत्वावर सुरु असलेल्या सहकारी सूतगिरण्यांनी आपले पाय भक्कम केले. पुढे डेक्कन च्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्रामध्ये १९६१ पर्यंत कोल्हापूर,अमरावती,श्रीरामपूर,लातूर,भुसावळ,नांदेड इत्यादी ठिकाणी अनेक सहकारी सूत गिरण्या स्थापन करण्यात आल्या होत्या. १९६४ मध्ये यवतमाळ जिल्ह्यात कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी स्थापन झाली होती.त्यानंतर १४ सहकारी तत्वावर कापूस उत्पादित भागात सहकारी सूतगिरण्या स्थापन झाल्या. त्यानंतर सोलापूर येथे १९६७ मध्ये,नागपूर येथे १९६८ मध्ये सहकारी तत्वावर उत्पादन सुरु झाले.

सन २००० च्या दरम्यान ४४ सहकारी सूतगिरण्या स्थापन झाल्या होत्या आणि ७८ संयुक्त गिरण्या होत्या.२००५-२००६ मध्ये ८० सहकारी सूतगिरण्या होत्या.२००६-२००७ मध्ये १८३ सहकारी सूतगिरण्या पैकी उत्पादनाखालील सहकारी सूतगिरण्या संख्या ३९ असून प्राथमिक अवस्थेतील सहकारी सूतगिरण्या संख्या ६३ इतकी होती. सन २०११ साली महाराष्ट्रामध्ये एकूण १५३ सूतगिरण्या पैकी ८३ सहकारी सूतगिरण्या सहकारी तत्वावरील आहेत.६४ खाजगी,५ केंद्रशासन पुरस्कृत व १ राज्यशासन पुरस्कृत आहे तर २०१३-२०१४ मध्ये सहकारी सूत गिरण्या संख्या ५३ इतकी कमी झाली म्हणजेच कार्यरत सहकारी सूतगिरण्यांची संख्या दिवसेंदिवस घटत चालल्याचे दिसत आहे.

IV) **अभ्यासाचे महत्व :-**

पश्चिम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सहकारी सूतगिरणी उद्योगांचे स्थान महत्वाचे आहे,कारण कापूस उत्पादन आणि कापूस प्रक्रिया उद्योग या दोन्ही प्रकारच्या उपक्रमामध्ये पश्चिम महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्रामध्ये सन २०१३-२०१४ मध्ये कार्यरत

असलेल्या एकूण सहकारी सूत गिरण्यांची संख्या ५३ इतकी असून त्यापैकी एकट्या पश्चिम महाराष्ट्रात (कोल्हापूर जिल्ह्यात १० ,सांगली जिल्यात ०९ ,सातारा जिल्ह्यात ०२ तर सोलापूर जिल्यात ०६) २७ सहकारी सुत गिरण्या कार्यरत आहेत.म्हणजेच ५०% हून अधिक सहकारी सुत गिरण्या पश्चिम महाराष्ट्रात आहेत त्यापैकी अनेक सहकारी सूतगिरण्या आजारी अवस्थेत अथवा आर्थिक नुकसानीमध्ये जात असल्याचे दिसत आहे. तसेच पश्चिम महाराष्टामध्ये काही सहकारी सुतगिरण्या आदर्शवत चालू असल्याचे देखील दिसते आहे.या दोन्ही परिस्थितीची कारणे शोधून त्यावर आवश्यक असणाऱ्या उपाय योजना व शिफारशी करण्याकरिता सदर संशोधन अभ्यास महत्व पूर्ण ठरतो.

अर्थशास्त्रातील सिद्धांतानुसार एखादी उद्योगसंस्था नफ्यामध्ये असण्याकरिता सरासरी खर्च हा सरासरी प्राप्ती समान अथवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक असते.परंतु वास्तविकता सर्वच उद्योग संस्था या अवस्थेमध्ये असतात असे नाही.ज्या उद्योग संस्थेचा सरासरी प्राप्तीपेक्षा सरासरी खर्च नेहमीच कमी असतो.अशा उद्योगसंस्था इतर उद्योग संस्थाकरिता आदर्श ठरतात किंवा त्यांचे आर्थिक वर्तणूक स्वीकारतात.

या बाबींचा अभ्यास करण्याचा सदर संशोधन अभ्यासामध्ये प्रयत्न केला जाणार आहे.

v) साहित्याचा परामर्श (Review of Literature)

लोखंडे एम ए- (२००७) यांनी जालना सहकारी सूतगिरणीचा अभ्यास करताना असे नमूद केले की,ग्रामीण औद्योगीकरणामध्ये सहकारी कृषी प्रक्रिया उद्योग अत्यंत महत्वाची भूमिका बजावत आहेत.सहकारी हातमाग,यंत्रमाग,आणि सूतगिरणीच्या बाबतीत महाराष्ट्र हे अग्रेसर असणारे राज्य आहे.सदर संशोधन अभ्यासाचे वर्गीकरण असे दर्शविते की,एकंदरीत सहकारी सूतगिरण्यापैकी २३% सूतगिरण्या कार्यरत होत्या आणि नुकसानीत आणाऱ्या सूतगिरण्या ३६% इतक्या होत्या.तसेच ज्या सूत गिरणीचा अभ्यास केला त्या बाबतीत त्यांना असे दिसून आले की,ज्यांना सहकारी सूतगिरणी प्रत्येक उपक्रमामध्ये अपयशी ठरली आहे.अभ्यासाच्या शेवटही शिफारशी करताना असे सुचविले की,अशा नुकसानी मध्ये असणाऱ्या सूतगिरणीसाठी व्यावसाईक स्वरूपाच्या नेतृत्वाची गरज आहे.

भारतातील वास्त्रोद्योगावरील अहवाल जो कार्पोरेट कट्यालिस्ट इंडिया प्रा.लि.,(२०१४) नी प्रकाशित केले,ज्यामध्ये भारतातील वस्त्रोद्योगाचा मागोवा घेत असताना असे स्पष्ट केले की,हा जगातील अग्रेसर असणारा वस्त्रोद्योग असून सन १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणामुळे देशातील वस्त्रोद्योगांची स्थिती बदलत असल्याचे दिसत आहे.ह्या क्षेत्रातील उत्पादनाचा एकूण औद्योगिक उत्पादनातील १४% इतका हिस्सा आहे.तसेच एकूण निर्यात मिळकतीच्या १७% निर्यातीपासून मिळकत मिळते.अहवालाच्या शेवटी असे भाकीत करण्यात आले की,भारतीय वस्त्रोद्योगाला जवळपास US $२२० अब्जापर्यंत व्यापार करण्याची संधी सन २०२० पर्यंत आहे.

संबंदम सूत गिरणीच्या कामगिरी परीक्षणाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न आर.पुनिथा (२००४) यांनी केला.त्यांच्या मते,उत्पादकता ही प्रगतीची अथवा उन्नतीची गुरुकिल्ली आहे. ज्याच्यामुळे श्रम,भांडवल,उर्जा आणि साधने यांच्या वापराची गुणवत्ता प्रकट करतो.देशातील वाढत्या मागणीची पूर्तता करण्याकरिता,सूतगिरण्यांचे आधुनिकीकरण करून उत्पादकता वाढवणे त्यातून शक्य होऊ शकते.अशी त्यांनी अंतिमतः शिफारस केली.

झाला विरंभभाई (२०१०) यांनी भारतातील वस्त्रोद्योगाच्या उत्पादकतेचा आणि वित्तीय कार्यक्षमतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या मते,वस्त्रोद्योग क्षेत्र हे स्थूल देशांतर्गत उत्पादनात भर टाकून,रोजगार निर्मिती करून आणि विदेशी चलन मिळवून भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे.तसेच भारताला या उद्योगातील विशेष वर्गातील वस्तूंना इतर देशांच्या तुलनेत बऱ्याच प्रमाणात तुलनात्मक लाभ आहे.परंतु हा लाभ टिकवण्यासाठी अथवा सुधारण्याकरिता उत्पादकता वाढवणे अत्यंत गरजेचे आहे.

कन्नन आर व्ही -(२००४) यांनी सहकार क्षेत्रातील वस्त्रोद्योगाच्या वित्तीय कामगिरीवरती संशोधन करण्याचा प्रयत्न केला.त्याच्या मते, वस्त्रोद्योग हा भारतातील शेतीनंतरचा मोठा उपक्रम आहे.सहकार क्षेत्रातील सूतगिरण्या दुहेरी हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतात.एक म्हणजे कापूस उत्पादकांना किफायतशीर किंमत राखून ठेवणे व दुसरा हेतू म्हणजे हातमाग विणकरांना किफायतशीर किंमतीमध्ये सूत सरळ उपलब्ध करून देणे.त्यांच्या अभ्यासातून असे प्रकट होते की अनिश्चित बाजार आणि नियोजनाचा अभाव यामुळे उत्पादनाचे मूल्य,अतिरिक्त मूल्य आणि विक्री यामध्ये नेहमी स्थित्यंतर येतात.

सिंग कतार आणि पुदीर आर एस- (२०००) यांच्या अभ्यासानुसार सहकार क्षेत्र हे संघटनेचा असा प्रकार आहे.जो विकसित राष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे आणि सहकारामध्ये ग्रामीण विकासाचे महत्वाचे साधन बनण्याची संभाव्यता आहे.यांचा अभ्यास

सहकाराचे ग्रामीण विकासातील योगदानाचे परिक्षण करतो.अभ्यासाचे निष्कर्ष दर्शवितात की जरी सहकाराचे क्षेत्र आर्थिक व सामाजिकदृष्ट्या महत्वाचे असले तरी सहकार क्षेत्र मात्र अंतर्गत आणि बहिस्थ समस्यांनी ग्रासलेले आहे.एक व्यावसाईक संस्था म्हणून विकसित होण्याकरिता बऱ्याच अडथळ्यांना सामोरे जावे लागते.असे त्यांच्या अभ्यासातून दिसून आले.हे अडथळे जसे की, व्यवस्थापनातील व्यावसायिकतेचा अभाव,ताठर सहकारी कायदा,शासनाचे अति नियंत्रण आणि हस्तक्षेप,चांगल्या नेतृत्वाचा अभाव,कामगिरी आधारित प्रोत्साहन पद्धतीचा अभाव, इ. होय. अभ्यासाच्या शेवटी संशोधक सुचवितात की,ह्या प्रकारचे अडथळे दूर झाल्याशिवाय सहकार क्षेत्र विकसित होणार नाही.

राष्ट्रीय उपयोजित आर्थिक संशोधन मंडळाच्या (National Council of Appliad Economic Research, २००९) अहवालानुसार वस्त्र आणि कापड उद्योग हा देशासाठी निर्यातीपासून मिळकत मिळवून देणाऱ्या उद्योगापैकी एक महत्वाचा उद्योग आहे.सध्या संपूर्ण उद्योगामध्ये मोठी व्यावसायिक पुर्नरचना होत आहे. उद्योगांच्या विविध घटकामधील संथ आणि विषम आधुनकीकरणामुळे प्रगतीच्या अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.हा अहवाल वस्त्रोद्योगाच्या विकासाची मुलभूत परीमाणाना पर्यायी परिमाणे पुरविण्याचा प्रयत्न करतो.अहवालाच्या निष्कर्षानुसार भारतीय वस्त्रोद्योगामध्ये आधुनकीकरणांची कमतरता आहे.त्याकरिता शासकीय गुंतवणुकीबरोबर विदेशी थेट गुंतावनुकीचा वापर योग्य रीतीने होणे आवश्यक आहे.

तनेजा रश्मी (२०१२) यांनी भारतीय वस्त्रनिर्यात :- भूतकाळ आणि वर्तमानकाळ याविषयावरती संशोधन करण्याचा प्रयत्न केला.त्यांच्यामते सूत आणि कापड निर्मिती करणारे क्षेत्र हे देशातील दुसरे मोठे वस्तुनिर्मिती क्षेत्र आहे.त्यांच्या संशोधनाने सन २००१-२००२ नंतरच्या वस्त्रनिर्यातीमधील प्रवृत्ती शोधण्याचा प्रयत्न केला.भारतीय सूत आणि वस्त्र निर्यात अजूनही अपेक्षेप्रमाणे होत नाही असे दिसते.त्याकरिता उद्योग आणि धोरण असे (Industry and Policy Makers) या दोघांनी निर्यात वाढीसाठी एकत्रितपणे काम करणे गरजेचे आहे.त्याकरिता सूक्ष्म आणि स्थूल पातळीवरती या क्षेत्राची स्पर्धात्मकता वाढण्याची शक्यता मोठी असल्याचे दिसते.

श्रीमली देवेंद्र (२०१३) यांनी अमेरिकन बाजारपेठेतील भारतीय वस्त्र आणि कापड उद्योगांच्या कामगिरीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासानुसार सूत आणि कापड कराराखालील कोटा पद्धत संपुष्टात आल्यापासून असे भाकीत करण्यात येत होते की,जागतिक सूत आणि कापड उद्योगाचा पाया आशिया खंडाकडे सरकेल तसेच भारतासोबत चीनदेखील बदलल्या परिस्थितीचे मोठे लाभार्थी असतील.परंतु वास्तवामध्ये असे होताना दिसत नाही.सदरचा अभ्यास जागतिक सूत आणि कापड निर्यातीतील प्रवृत्ती (Trend) चा आणि भारतीय वस्त्रोद्योगाची निर्यात कामगिरी तपासण्याचा प्रयत्न करतो.या अभ्यासाच्या निष्कर्षानुसार भारतीय वस्त्रोद्योग अमेरिकेच्या बाजारपेठेतील चीन शी तुलना करता आपला हिस्सा फक्त गमावत नसून,बांगलादेश आणि कंबोडिया सारख्या लहान देशांशी निर्यात स्पर्धा करणे देखील अवघड बनले आहे.हि परिस्थिती बदलण्यासाठी भारतीय सूत व कापडाची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सावंत बी.एस. (२०१२) यांनी इचलकरंजी सहकारी सूतगिरणीतील लोक व्यवस्थापन कृतीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला.यांच्यामते सहकारी सूतनिर्मिती क्षेत्राने लहान आणि सीमांत कापूस उत्पादन शेतकऱ्यांच्या आणि मागास प्रवर्गातील विणकरांच्या आर्थिक उन्नतीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली आहे.ह्या अभ्यासाने कापूस शेतकरी आणि कापूस प्रक्रिया करणारे कामगार यांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास केला.या अभ्यासाचे निष्कर्ष असे दर्शवितात की,सहकारी सूतगिरणीतील कामगारांची सामाजिक आर्थिक परिस्थिती कमालीची सुधारली आहे.परंतु कापूस उत्पादक सीमांत शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती मात्र अजून बदललेली नाही.त्या करिता प्रयत्न करणे गरजेचे आहे.

VII) संशोधन आराखडा :-

अभ्यासाचे महत्व :-

अन्न, वस्त्र व निवारा ह्या मानवाच्या मुलभूत गरजा मानल्या गेल्या आहेत. तेव्हा कापडाला जगभरात भरपूर मागणी राहिली आहे आणि पुढेही राहणार आहे. हा उद्योग आजही श्रम प्रधान उद्योग म्हणूनच ओळखला जातो. भारतात शेती व्यवसायानंतर अधिक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा वस्त्रोद्योग हा एकमेव व्यवसाय असून शेतीप्रधान देशात या व्यवसायाचे महत्व अनन्यसाधारण आहे व ते यापुढेही टिकून राहणार आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत वस्त्रोद्योगाला महत्वाचे स्थान आहे. शेतीनंतर सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करून देणारा, १२ ही महिने चालणारा व देशाच्या औद्योगिकीकरणात महत्वपूर्ण योगदान देणारा सहकारी सूतगिरण्या हा एक महत्वपूर्ण व्यवसाय आहे.

VIII) विषयाची निवड :-

महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारचे व्यवसाय सुरु आहेत. परंतु त्यामध्ये सहकारी सूत गिरण्याचे योगदान महाराष्ट्राच्या अर्थ व्यवस्थेत खूप मोठे होते. परंतु आलीकडे या सहकारी सूत गिरण्या चे योगदान कमी होत आहे. म्हणुन या सहकारी सूतगिरणी उद्योगाला चालना देण्यासाठी व हा व्यवसाय नुकसानीत का जात आहे त्या मागील कारणांचा शोध घेण्याकरता व त्यावरील उपाय योजनांची माहिती घेण्याकरता हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

IX) उद्दिष्टे :- (Objectives)

१) पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सुतगिरण्यामधील नफा-तोट्या चा अभ्यास करणे.

२) पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सुतगिरण्यामधील रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे.

३) पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सुतगिरण्यामधील उत्पादकता अभ्यासणे.

४) पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सुतगिरण्याकडून पुरवल्या जाणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणे.

X) गृहीतके :- (Hypothesis)

१) पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरण्याचे निव्वळ उत्पन कमी होत आहे.

२) पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरण्यामधील तोटा वाढत आहे.

३) पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरण्यामधील रोजगारात घट होत आहे.

XI) संशोधन पद्धती :-(Research Methodology)

संशोधनामध्ये अनेक पद्धतीचा अवलंब केला जातो. उदा. आन्वेश्नात्मक, वर्णनात्मक, निदानात्मक, प्रयोगात्मक इत्यादी होत. परंतु सदरच्या संशोधनामध्ये संशोधन करण्याकरता विश्लेशनात्मक पद्धती स्वीकारलेली आहे.

अभ्यासाची व्याप्ती :-(Scope of the Study)

प्रस्तुत संशोधन अभ्यासामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूतगिरण्यांचा अभ्यास केला जाणार असून त्याकरिता हा नमुना निवड पद्धतीच्या आधारावर निवडक सहकारी सूतगिरण्या निवडल्या जाणार आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी सूतगिर्णीचे प्रतिनिधित्व ह्या निवडलेल्या नमुना सहकारी सूतगिरण्या करणार आहेत.

संशोधनाच्या मर्यादा :- संशोधना मध्ये पश्चिम महाराष्ट्रा तील निवडक सहकारी सूत गिरण्याचा आभ्यास केला जाणार आहे.

माहिती संकलन :- (Data Collection)

प्रस्तुत विषयाच्या संशोधन अभ्यासाकरिता 1) प्राथमिक सामग्री तसेच 2) दुय्यम सामग्री साधनांचा वापर करण्याचे योजले आहे.

1) **<u>प्राथमिक सामग्री</u>** -

प्राथमिक माहिती संकलनामध्ये नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे. सहकारी सूतगिरणीमधील कामगार, प्रशासकीय अधिकारी,तसेच संशोधनाच्या माहिती संकलना संबंधित आवश्यक माहिती व्यक्ती व संस्थाकडून योग्य प्रश्नावली आधारे प्राथमिक माहिती गोळा केली जाईल.

2) **<u>दुय्यम सामग्री –</u>**

दुय्यम माहिती शासकीय अहवाल जसे कि, पश्चिम महाराष्ट्राची आर्थिक माहिती अहवाल,अर्थ व सांखिकी संचालानाकडील अहवाल, सहकारी आयुक्त कार्यालयातील उपलब्ध सांखिकी तसेच सहकारी सूतगिरण्यांचे वार्षिक अहवाल यासारख्या इतर स्रोताकडून एकत्रित केली जाईल.

<u>संशोधन अभ्यासाची परिमाणे :-</u>

सदरचा अभ्यास ठराविक परिणामांच्या आधारे करण्याचा प्रयत्न केला जाईल.प्रस्तुत विषयाची व्याप्ती आणि महत्व लक्षात घेता उत्पादनाची शाश्वतता (Sustainability), लाभप्रदातता (Profitability),उत्पादकता (Productivity) उपलब्ध साधनांचा पर्याप्त- वापरासह आवश्यक असणाऱ्या इतर ही परिमाणांचा वापर करण्यात येईल.

<u>नमुना पद्धती :-</u>

पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी सूत- गिरण्यांचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी याद्दच्छिक नमुना पद्धतीचा (Stratified Random Sampling Method) उपयोग करून पश्चिम महाराष्ट्रातील काही सहकारी सूतगिरण्यांची निवड निवड केली जाईल. पश्चिम महाराष्ट्रातील चार जिल्ह्यातील प्रत्येकी दोन सहकारी सूतगिरण्यांची निवड केली जाईल. निवडलेल्या चार जिल्ह्यातील प्रत्येकी दोन सहकारी सूतगिरण्या निवडल्या जातील त्यापैकी एक आर्थिक प्रगतशील आणि एक आर्थिक मागासलेली सहकारी सूतगिरणी निवडली जाईल म्हणजेच पश्चिम महाराष्ट्रातील एकूण ०८ सहकारी सूतगिरण्यांचा चिकित्सक अभ्यास केला जाईल.

<u>अभ्यासाचा कालखंड :-(Period of the study)</u>

पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी सूतगिरण्या उद्योगाचा चिकित्सक अभ्यास करण्या करिता २००७ ते २०१७ असा दहा वर्षाचा कालखंड निवडलेला आहे.

<u>सांख्यिकी तंत्राचा वापर :-</u>

सहकारी सूतगिरण्यांचा चिकित्सक अभ्यास करण्याकरिता, ठरवलेली उद्दिष्टे अभ्यासण्या करिता सांख्यिकीय तंत्राचा जसे की Ratio,analysis, Centraltendency, Correlation, Compond growth rates, Average Method इत्यादींचा वापर करण्यांत येईल.

XII) नियोजित प्रकरणे (CHAPTER SCHEME)

प्रकरण १ ले प्रस्तावना व संशोधन पद्धती

प्रकरण २ रे पश्चिम महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक माहिती

प्रकरण ३ रे संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण ४ थे पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूत गिरण्यांच्या उत्पन्न व खर्चाचा अभ्यास

प्रकरण ५ वे पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूत गिरण्यांच्या नफा- तोट्याचा अभ्यास

प्रकरण ६ वे पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूत गिरण्यांच्या उत्पादकतेचा अभ्यास

प्रकरण ७ वे पश्चिम महाराष्ट्रातील निवडक सहकारी सूत गिरण्यांकडून दिलेल्या सुविधांचा आभ्यास.

प्रकरण ८ वे निष्कर्ष व शिफारशी

वरील संशोधनाचा उपयोग पश्चिम महाराष्ट्रातील आर्थिक दृष्ट्या नुकसानीत गेलेल्या, बंद पडण्याचा मार्गावर असणाऱ्या सहकारी सूत गिरण्याना होणार आहे.

संदर्भ - (References)

1. Lokhande M.A.(2007) Critical Analysis of Co-operative Spinning Mills with Special Reference to Jalana Co-operative Spining Mill,Jalana,Co-oprative Perspective,Vol.41,PP No. 32-41.
2. Corporate Ctalyst India Pvt.Ltd.(2014),A brief report on Textile Industry in India,Corpotate Catalyst India Pvt.Ltd.,New Delhi.PP 1-13.
3. Punitha R.(2004) A Study Performance Evaluation of Sambandam Spinning MillsLtd.,Salem .,M.Phil Dissertation,Periyar University,Salem,PP 61-84.
4. Zala Virambhai(2010),A Study of Productivity and Financial Efficiency of Textile Industry of India,Ph.D. thesis Submittad to Sourashtra University,Rajkot,Gujrat,PP 211-224.
5. Kannan R.V.(2004) Financial Performance of Textile industry in Co-oprative Sector in Tamilanadu,The Gandhigram Rural Institute,Gandhiram,Tamilnadu,PP 2-31.
6. Sing Katar and Pundir R.S. (2004) Co-operatives and Rural Development,Institute of Rural Management,Anand (Gujarat),PP 49-60.
7. Tanja Rashmi (2012)Indian Textile Exports:Past and Present,International Journal in Multidisciplinary and Academic Research,Vol.2,No.2,March-April2008.

8. National Council of Applied Economic Research (2009),Report on Assessing the Prospects for India’sTextile and Clothing Sector,National Council of Applied Economic Research ,New Delhi.
9. Sawant B.S.(2012), People Management Practices at Ichalkaranji Spinning Mills: An Investigative Study,International Journal of Research in Computer Application and Managemet,Jagadhri, Hariyana, Vo1.2,Issue No.7.
10. Shrimali Devendra (2013),Performance of Indian Textile and Clothing Industry in the United States Market :A Post ATC Analysis,Abhinav National Jurnal of Research in Commerce and Management,Vo1.No.2,
11. ShreeShinde K.B.(2002)An Economic Analysss Shetakari, Sahakari Sootgirani, Ltd,Sangola.Unpublished, M.Phil, Dessertation Submitted to be the Shivaji University Kolhapur.
12. वस्त्रोद्योग पणन महासंघ – मुंबई (Financial position for the year (2013 - 2014)

- मार्गदर्शक -

डॉ. विकास. वि.सुकाळे
संशोधन मार्गदर्शक व
अर्थशात्र विभाग प्रमुख,
पीपल्स कॉलेज,नांदेड.

- संशोधक -

संभाजी भगवान शिंदे (एम.ए.)
विज्ञान महाविद्यालय ,सांगोला
ता.सांगोला जि.सोलापूर .